# बालगुन्हेगारी एक सामाजिक समस्या

प्रा. कु. सरोज यादवराव लखदिवे,
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख,
इंदिरा महाविद्यालय, कळंब.

मुल हे ओल्या मातीचा गोळा असतो. जसे घडविले तसे घडते, असे आधी म्हटले जायचे. मात्र आता परिस्थिती बदलली आहे. बदलाच्या कौटूंबिक वातावरणामुळे आईवडीलांना मुलांसाठी पुरेसा वेळ नाही. त्यात मुलांचे जग विस्तारले आहे. ट्युशन, शाळा, कॉलेज, विविध क्लासेस निमित्त मुळे जास्तीत जास्त वेळ बाहेर राहतात. बाहेरच्या वातावरणाचा त्याच्यावर जास्त प्रभाव पडतो. उठता बसता संस्कार करणारे आई वडिल त्यांना नको असते. पालक मात्र आपली मुले लहानच आहेत असे समजून चालतात.

पालकांनी दुर्लक्ष केल्यामुळ पालकांशी सतत संघर्ष होत असल्यामुळे, सांपत्तीक स्थिती खराब असल्यामुळे वारंवार अपयश आल्यामुळे अनेक मुलांच्या मनात भावनक संघर्ष निर्माण होतो. आणि मुल गुन्हेगारी प्रवृत्ती कडे वळते.

आजचे गुन्हेगार मुळ हे इतर मुलांपेक्षा मुळातच वेगळे नसते. त्यांच्या इच्छा, आकांक्षा, प्रेरणा इतर मुलांसारख्याच असतात पण काही वैयक्तिक आणि परिस्थितीजन्य अडचणीमुळे त्यांची वर्तणूक बिघडलेली दिसते. ह्या अडचणी आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतीक प्रश्नांबाबत निर्माण झालेल्या असतात. हे बिघडलेले मुल मग कायद्याच्या कचाट्यात सापडते. ज्या समाजाच्या रक्षणासाठी कायदे केलेले असतात त्याच समाजाचा मुल एक घटक असते आणि समाजानेच दुर्लक्ष केल्याने ते गुन्हेगार झाले असते.

बहुतेक बालगुन्हेगार मोठेपणी गुन्हेगार होण्याची शक्यता असते. कुटूंबाचे व समाजाचे बालगुन्हेगारीमुळे बरेच नुकसान होते. बालगुन्हेगाराचे पुनर्वसन करण्यात बरीच शक्ती व पैसा खर्च होतो.

व्याख्या :— १) एस. व्ही. राव, '' मानसिक विकृती असलेली व लहानपणापासूनच मानसिक ताण असलेली जी अपसामान्य वर्तन दाखवितात ती म्हणजे बालगुन्हेगारी होय.''

२) भारतीय दंडविधान संविधानामध्ये बालन्याय कायदा (१९८६) '' १६ वर्षाखालील मुलगा व १८ वर्षाखालील मुलगी जेव्हा कायद्याच्या चौकटीत न बसणारे वर्तन करतात तेव्हा ती बालगुन्हेगार ठरतात.''

**बालगुन्हेगारीची कारणे :—**

१) अनुवंशिकता : बालकामध्ये गुन्हा करण्याची प्रवृत्ती हा अनुवंशिक गुणांचा प्रभाव असतो असे लेम्ब्रोसो व त्यांच्या अनुयायाचे मत होते तर लीन या मानसशास्त्रज्ञांच्या मते मुलांमध्ये xy व मुलीमध्ये xx ही रंगसुत्रे असतात तर काही व्यक्तींमध्ये xxy अशी तीन रंगसुत्रे असतात. ज्या व्यक्तीमध्ये y हे रंगसुत्र जादा असते अशी व्यक्ती आक्रमक, बेजबाबदार व बौध्दीक स्तर कमी असलेली असते. ती बालगुन्हेगार बनण्याची शक्यता अधिक असते.

२) **मेंदूविकृती** :— मुलांचे स्वत:च्या वर्तनावर नियंत्रण राहात नाही. अशी मुले अतिसंवेदनशिल, भावनिकदृष्ट्या असंतुलित व आक्रमक असतात. अशा मुलांना थोडे प्रोत्याहन मिळाले तरी ते गुन्हा करण्यास प्रवृत्त होतात.

३) मज्जाविकृत मुले :— मनातील चिंता, तणाव यांना वाटत करून देण्यासाठी अशी मुले गुन्हे करतात परंतु गुन्हा केल्यानंतर त्यांना पश्चाताव होतो.

४) व्यक्तीमत्व घटक :— बालगुन्हेगारी करणाऱ्या मुलांमध्ये व्यक्तीमत्वाचे काही गुण प्रकर्षाने दिसतात. सामान्य मुलांच्या तुलनेत अपराध करणारी मुले भीतीशी अभिसंधित प्रतिक्रिया लवकर शिकु शकत नाही. या व्यतिरिक्त अपराधी मुलांमध्ये ऋणात्मक आत्महत्या हे लक्षण दिसून येते.

५) विकृत कुटूंबे :— ज्या कुटूंबातून मुलांना सामाजिक जबाबदारीची शिकवण दिली जात नाही अशी कुटूंबे बालगुन्हेगारीस जबाबदार असतात. अशा कुटूंबाचे खालील प्रकार आहेत.

अ) भग्न कुटूंबे

ब) अनैतिक कुटूंबे

क) तिरस्कृत कुटूंबे

ड) मातेचे प्रभुत्व असलेली कुटूंबे

६) कुटूंबाची आर्थिक स्थिती :— कनिष्ठ आर्थिक परिस्थिती असलेल्या कुटूंबातून बालगुन्हेगाराचा उदय झाला असे दिसून येते. मुलांच्या सर्व इच्छा आईवडील पूर्ण करू शकत नाही त्यामुळे ते आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी गुन्हे करतात.

७) शहरीकरण व झोपडपट्टी :— औद्योगिक विकासामुळे शहरीकरणात झपाट्याने वाढ होत आहे. पोटभर अन्न मिळविण्यासाठी आईवडील धडपड करीत असतात त्यामुळे त्यांचे मुलांकडे लक्ष राहात नाही. त्यामुळे अशी मुले गुन्हे करतात.

८) समवयस्कांचा प्रभाव :— गुन्हेगार मुले सहसा एकच गुन्हा करत नाही. जास्तीत जास्त मुले ही मित्रांबरोबरच गुन्हे करतात.

९) हिंसा दर्शनाचा प्रभाव :— अनेक चित्रपटातून व दुरदर्शनाच्या कार्यक्रमातून हिंसाचार मोठ्या प्रमाणात दाखविला जातो. याचा परिणाम मुलांच्या बालमनावर होतो.

१०) बालसंगोपन पध्दती :— बालगुन्हेगारी व बालसंगोपन यांचा संबंध अनेक संशोधनातून सिध्द झाला आहे. उदा. बालकात चोरी करणे हे सुरूवातीला समजत नाही त्यामुळे ते वर्गमित्रांच्या पेन, पेन्सील चोरून आणते. अशावेळेस घरातील व्यक्ती ही गोष्ट कशी चुकीची आहे हे जर पटवून दिले तर पुन्हा त्या वस्तू तो आणणार नाही पण त्याला जर त्या वस्तू आणणे म्हणजे चोरी करणे आहे व त्या वस्तू त्याने वापस करून द्याव्या असे सांगितले तर तो त्या वस्तू वापस करेल. जर त्याला समजावले नाही तर तो अशा वस्तू आणतच राहील व मग त्याला चोरीची सवय लागेल.

बालगुन्हेगारी नष्ट करण्यासाठी उपाय :— बालगुन्हेगारी नष्ट करण्यासाठी दोन प्रकारचे उपचार केले जातात. एक म्हणजे बालगुन्हेगारांना सुधारण्याच्या प्रयत्न करणे. दुसरा म्हणजे समाजात बालगुन्हेगार तयारच होवू नये म्हणजे प्रतिबंधात्मक उपाय योजने.

सुधारणात्मक उपाय :— बालगुन्हेगारांना सुधारणसाठी शिक्षेऐवजी शिक्षण या मुलभूत दृष्टीकोनावर सर्व उपचार पध्दती आधारलेल्या असतात.

१) बालगुन्हेगारांसाठी स्वतंत्र न्यायालये असतात. मुलांचा गुन्हा कबुल झाल्यानंतर त्याला रिमांड होम, बोर्स्टल शाळा सर्टिफाईड अप्रव्हड स्कुल, प्रोबेशन होस्टेल यासारख्या संस्थामध्ये शालेय शिक्षण, सुतारकाम, विणकाम, चित्रकला, बागकाम अशा प्रकारचे शिक्षण दिले जाते. सरकारी नोकऱ्या उपलब्ध करून दिले जाते. अशा पध्दतीने त्यांचे पुर्नवसन होते.

२) प्रतिबंधात्मक उपाय :– बालगुन्हेगारीला आळा घालण्यासाठी उपचारापेक्षा प्रतिबंधक उपायांनाच अधिक महत्व द्यायला पाहिजे व या उपायांची सुरूवात सुरूवातीच्या काळातच व्हायला पाहीजे. तरच ते परिणामकारक होईल. प्रतिबंधाचे पुढील उपाय सांगता येईल.

१) समुदाय नियोजन :– अपराध वर्तनाला प्रतिबंध करण्यासाठी समुदाय जीवनाचे विशिष्ट पध्दतीने नियोजन करावयास हवे. मुलामुलींसाठी बालपीट संघटना व तरूणांसाठी YMCA किंवा YWCA सारख्या संस्था समाजात निर्माण करावयास पाहीजे. व्यावसायीक, सामाजिक व राजकीय कार्यकर्तेदेखील या दृष्टीने महत्वाचे कार्य करू शकतात. जसे झोपडपट्टीतील लोकांना शिक्षण देणे, त्यांचे राहणीमान सुधारणे, युवकांसाठी कला केंद्र, क्रिडाकेंद्र स्थापन करणे असे केल्यास गुन्हेगारीला आळा बसेल.

संशोधनाचा उद्देश :–

१) मुलांच्या समस्यांचा विचार करणे.

२) अशा अवस्थेमध्ये निर्माण होणाऱ्या मानसिक विकृतिचा त्यांच्या व्यक्तीमत्वावर होणारा परिणाम शोधणे.

३) सामाजिकरणातील पालकांची भूमिका लक्षात घेणे.

४) शारिरीक स्वास्थ, जिव्हाळा, आपुलकी, कौतुक न मिळाल्यामुळे त्यांच्या व्यक्तीमत्व विकासात काही दोष निर्माण होतो याचा शोध घेणे.

५) संकलित तथ्यांच्या आधारावर मुलांच्या समस्यांच्या निराकरणाच्या दृष्टीने उपाय सुचविणे.

७) आईवडिलांच्या अवास्तव अपेक्षांच्या ओझ्याचा दृष्परिणाम व त्यातून मानसिक विकृती तयार होते याचा शोध घेणे.

गृहितकृत्य :–

१) मुलांच्या अवास्तव समस्यामुळे ते गुन्हेगार बनतात.

२) दारिद्रय व कामाची कमतरता यामुळे बालगुन्हेगार बनतात.

३) आईवडिलांच्या अवास्तव अपेक्षांच्या ओझ्यामुळे त्यांच्यात मानसिक विकृती तयार होते व ते बालगुन्हेगार बनतात.

४) शारिरीक स्वास्थ, जिव्हाळा, आपुलकी कौतुक न मिळाल्यामुळे ते बालगुन्हेगार बनतात.

अध्ययन पध्दती व तथ्य संकलन :–

सदर शोध निबंधासाठी निदानात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात आला असून वैयक्तीक तथा सामुग्रीच्या आधारे संशोधन करण्यात आले आहे. ग्रंथ, वर्तमान पत्रातील लेख व इतर माहितीच्या आधारे तथ्यांचे संकलन करणत आले असून प्राप्त तथ्यांचे विश्लेषन तंत्राव्दारे वस्तूनिष्ठरित्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. त्यातून समस्या जाणून घेण्याचा व त्यांच मानसिक जडणघडणीला जबाबदार घटकांचा विचार करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

निष्कर्ष :–

कौटूंबिक वातावरणाचा, आजुबाजुच्या वातावरणाचा, अपयश मिळाल्यामुळे, वाईट संगतीमुळे, व्यसनाधीनतेमुळे, विवंचनेमुळे, समाजाबद्दल तिव्र राग निर्माण झाल्यामुळे बालगुन्हेगार तयार होत असतात. जी मुले असुरक्षित वातावरणात वाढते त्यांच्यामनात जगाविषयी शत्रुत्वाची भावना निर्माण होत असते. त्यांना जे मिळावे असे वाटते ते मिळविण्यासाठी ते हिंसक मार्गाचा पण अवलंब करतात असे दिसून आले.

संदर्भग्रंथ :–

१) मुले व गुन्हेगारी : अयालवारिस लिला–श्रीविद्या प्रकाशन
२) मानसशास्त्र बी.डी.गरूड, एस.बी.निंबाळकर, एन.आय.ठाकोर, सौ.तनुजा खेर, एस.एन.मोहिते.